# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली– ४४२६०५

फोन / फॅक्सनंबर ०७१३२–२२३१०४ E-Mail : development.section@unigug.ac.in


जा.क्र. / गों.वि.ग / म.वि.वि.वि / ५८७५ / २०२२ दिनांक : २० / ०६ / २०२२

## परिपत्रक

**विषय:-** शैक्षणिक सत्र २०२२-२३ करिता विशिष्ट विद्याशाखांच्या नवीन अतिरिक्त तुकडयांचे जलदगतीने अर्ज मागविण्याबाब.

**संदर्भ:-** शासन निर्णय क्र.एनजीसी-२०१७/(१२८/१७)मशि-४,दि.०४ जुलै,२०१७

गोंडवाना विद्यापीटाशी सर्व संलग्नीत महाविलयांना सुचित करण्यात येते की, उच्च माध्यमिक शालांत परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्याचे वाढते प्रमाण व विद्यार्थ्यांचा विशिष्ट अभ्यासक्रमाकडे असलेला कल विचारात घेता, कोणताही विद्यार्थी इच्छित उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये, याकरीता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०९(८) अन्वये महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शासन निर्णय क्र.एनजीसी-२०१७/(१२८/१७)मशि-४, दि.०४ जुलै, २०१७ नुसार अतिरिक्त जलदगती तुकडीबाबत निकष व कार्यपध्दती निश्चित केलेली आहे.

ज्या महाविद्यालयांना शैक्षणिक सत्र २०२२-२३ करिता अतिरिक्त तुकडयांची आवश्यकता आहे, अशा महाविद्यालयांनी वित्त व लेखा विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे विद्याशाखानिहाय प्रत्येक अतिरिक्त तुकडीकरीता प्रस्ताव शुल्क रुपये १०,०००/- भरुन पावतीसह विहित नमुन्यात अर्ज साक्षांकीत करुन व शासन निर्णयातील तरतूदीनुसार आवश्यक कागदपत्रे जोडुन दि.०४ जुलै,२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत प्रस्ताव दोन प्रतित सी.डी. सह महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभागास सादर करावा.

20.6.2022

(डॉ.अनिल चिताडे)

कुलसचिव(प्र.)

कुलसचिव (प्र.)

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

प्रतिलिपी:-१) मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे कार्यालय.

२) मा.कुलगुरु महोदयांचे कार्यालय,गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली यांना माहितीस्तव सादर.

३) मा.वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली यांना माहितीस्तव सादर.

४) सिस्टीम ॲनालिस्ट,संगणक विभाग गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली यांनी सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रकाशित करावे.

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून असामान्य परिस्थितीत विशिष्ट विद्याशाखांच्या नवीन अतिरिक्त तुकड्यांना मंजुरी देण्याबाबतची जलदगती कार्यपद्धती आणि त्यासंबंधीचे निकष विहित करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**शासन निर्णय क्रमांक : एनजीसी-२०१७/(१२८/१७)/मशि-४**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : ०४ जुलै, २०१७.

**वाचा :** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ दिनांक ०१ मार्च, २०१७ पासून अंमलात आलेला आहे. उच्च माध्यमिक शालांत परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्याचे वाढते प्रमाण व विद्यार्थ्यांचा विशिष्ट अभ्यासक्रमाकडे असलेला कल विचारात घेता, कोणताही विद्यार्थी इच्छित उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये, हे विचारात घेऊन या अधिनियमातील कलम १०९ (८) मध्ये असामान्य परिस्थितीत विशिष्ट विद्याशाखांच्या अतिरिक्त नवीन तुकड्यांना जलदगती पद्धतीने मान्यता देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. अशा प्रकारे जलदगती पद्धतीने विशिष्ट विद्याशाखांच्या अतिरिक्त नवीन तुकड्यांना मान्यता देण्यासंदर्भातील निकष आणि कार्यपद्धती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून असामान्य परिस्थितीत विशिष्ट विद्याशाखांच्या नवीन जलदगती अतिरिक्त तुकड्यांना मान्यता देण्याकरीता पुढीलप्रमाणे कार्यपद्धती व निकष विहित करण्यात येत आहेत :-

**कार्यपद्धती :-**

१. ज्या महाविद्यालयांना जलदगती अतिरिक्त तुकडीसाठी अर्ज करावयाचा आहे, त्यांनी तो अर्ज या शासन निर्णयासोबत जोडलेल्या "**परिशिष्ट-अ**" मधील अर्जाच्या नमुन्यात संबंधित अकृषी विद्यापीठाकडे सादर करावा व "**परिशिष्ट-ब**" मध्ये नमूद केलेली कागदपत्रे अर्जासोबत जोडण्यात यावीत.

२. अर्ज स्वीकारण्याची कार्यपद्धती व अर्ज कोणत्या दिनांकापर्यंत स्वीकारावयाचे या संदर्भात संबंधित अकृषी विद्यापीठांनी स्वतंत्र सूचना निर्गमित कराव्यात. अशा सूचना निर्गमित करताना विद्यापीठाकडून असे प्रस्ताव शासनाकडे त्या शैक्षणिक वर्षाच्या दिनांक १० ऑगस्ट पर्यंतच सादर होणे आवश्यक असल्याची बाब विचारात घेण्यात यावी.